ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 34 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 34 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 04-M (OS)**

**Code No. : 04-M (OS)**

**ಶಿಕ್ಷಣ – II**

**EDUCATION – II**

# ಆಧುನಿಕ ಶಿಕ್ಷಣದಲ್ಲಿ ಮನೋವಿಜ್ಞಾನ

**PSYCHOLOGY IN MODERN EDUCATION**

( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ )

( Marathi Version )

**( ಹಳೆ ಪಠ್ಯವಸ್ತು )**

**( Old Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 30. 06. 2015

Date : 30. 06. 2015

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 100

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 100

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

**भाग – अ**

I. खालीलपैकी कोणत्याही **चार** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक उत्तर **तीन** पानापेक्षा जास्त असू नये. त्याच प्रश्नातील उपविभाग (a) व (b) ची उत्तरे एकत्रित देणे अनिवार्य आहे. प्रत्येक प्रश्नाला **दहा** गुण आहेत. $4 \times 10 = 40$

1. a) शैक्षणिक मानसशास्त्र म्हणजे काय ? परिणामकारी अध्ययन करताना मानसशास्त्राच्या भूमिकेचे वर्णन करा.

   b) आत्मनिरिक्षणाचे फायदे कोणते ? 6 + 4

2. a) ब्रूनरच्या आकलन विकासाच्या पायऱ्यांचे उदाहरणासह वर्णन करा.

   b) वाढ आणि विकास यामधील फरक कोणता ? 6 + 4

3. a) अंतर्ज्ञानात्मक अध्ययनासाठी आवश्यक असलेले घटक कोणते ? अंतर्ज्ञानात्मक अध्ययनाच्या कोहलरच्या ( Kohler's ) प्रयोगाचे वर्णन करा.

b) थार्नडाइक ( Thorndike ) यांचे अध्ययनाचे नियम सांगा. या नियमांची चर्चा करा. 6 + 4

4. a) स्मृती ( Memory ) चे प्रकार कोणते ? त्यांचे विश्लेषण करा.

b) स्मृती सुधारणाऱ्या घटकांचे वर्णन करा. 6 + 4

5. a) व्येयक्तिक वेगळेपणाच्या सहा क्षेत्रांचे थोडक्यात वर्णन करा.

b) वर्गातील अध्ययनामध्ये विद्यार्थी मागासण्याची कारणे कोणती ? 6 + 4

6. a) मुलांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी घेतलेल्या कोणत्याही पाच उपायांचे थोडक्यात वर्णन करा.

b) प्रक्षेपणविषयक तंत्र हे व्यक्तीमत्व चाचणीहून कसे वेगळे आहे ? 6 + 4

7. a) शाळेमध्ये अनुकूल वातावरण निर्माण करण्यात शिक्षकाच्या भूमिकेचे वर्णन करा.

b) गटाचे गुणधर्म कोणते ? 6 + 4

## भाग – ब

II. खालीलपैकी कोणत्याही **सात** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक उत्तर **एक** पानापेक्षा जास्त असू नये. प्रत्येकी **पाच** गुण आहेत. 7 × 5 = 35

8. पौगंडावस्थेच्या ( Later Childhood ) वेळी बौद्धिक विकासामध्ये आपल्याला कोणते बदल आढळून येतात ?

9. वर्चस्व अध्ययनाची व्याख्या सांगा. वर्चस्व अध्ययनाची गरज सांगा.

10. आवडीचे प्रकार सांगा. आवडीच्या स्वभावाचे थोडक्यात वर्णन करा.

11. सर्जनशीलताचा अर्थ सांगा. विद्यार्थ्यामध्ये सर्जनशीलता निर्माण करण्याच्या पद्धतींची यादी करा.

12. शिक्षकाने अध्ययनाचे हस्तांतरण करण्याकरीता कोणते उपाय हाती घेतले पाहिजेत ?

13. प्रतिभावंत मूले ही मागासलेल्या मुलांपेक्षा कशी वेगळी आहेत ?

14. प्रक्षेपणविषयक तंत्र म्हणजे काय ? व्यक्तीमत्व चाचणीमध्ये वापरलेल्या कोणत्याही दोन प्रक्षेपणविषयक तंत्रांचे उदाहरणासह वर्णन करा.

15. मानसिक निरोगी व्यक्तींचे गुणधर्म कोणते ?

16. सत्यतेवर आधारीत स्व-संकल्पनाचा मुलांमध्ये विकास घडवून आणण्याकरिता शिक्षकाने हाती घेतलेले कोणतेही पाच उपाय लिहा.

17. शिक्षकाला शैक्षणिक मानसशास्त्राचे होणारे कोणतेही पाच फायदे लिहा.

**भाग - क**

III. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये. प्रत्येक प्रश्नाला तीन गुण असतील. $5 \times 3 = 15$

18. हाती घेतलेल्या व्यैयक्तिक अभ्यास ( case study ) मध्ये आलेल्या कोणत्याही तीन समस्या सांगा.

19. हस्तांतरीत अध्ययनाचे महत्व कोणते ?

20. शोध अध्ययन म्हणजे काय ? त्याच्या चार निष्पत्ती कोणत्या ?

21. विद्यार्थ्यांमध्ये कमी संपादन होण्याची कारणे कोणती ?

22. निराशा म्हणजे काय ? निराशेच्या गुणधर्मांची यादी करा.

23. भावनिक अस्थिरतेची कोणतीही सहा कारणे सांगा.

24. व्यक्तीमत्वाचा संकोचित ( Narrow ) आणि विस्तृत ( विस्तारित ) अर्थ कोणता ?

## भाग – ड

IV. खालील सर्व प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक उत्तर **एक** ते **दोन** वाक्यापेक्षा जास्त असू नये. प्रत्येक प्रश्नांला 1 गुण आहे. 10 × 1 = 10

25. वर्तणूकीचा अर्थ लिहा.

26. मुलांमधील भावनिक गरजा कोणत्या ?

27. विकासाच्या मर्यादा ठरविणाऱ्या घटकांची नांवे सांगा.

28. सकारात्मक हस्तांतरीत अध्ययनाचे उदाहरण द्या.

29. अध्ययनाची व्याख्या सांगा.

30. समाजमिति ( Sociometry ) म्हणजे काय ?

31. मूले भाषा कशी शिकतात ?

32. साधना ( Performance ) चाचणी यानी प्रथमत: आमलात आणली ?

33. बौद्धिकतेच्या गट चाचणीचे उदाहरण द्या.

34. ऑलपोर्टनुसार व्यक्तीमत्व म्हणजे काय ?